# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

सहकार हाईट (पाच मजली इमारत), पहिला मजला, महानगरपालिका बिल्डींग, डिवाईन चर्च जवळ,
मिनाताई ठाकरे मंडईच्या बाजुला, गणेश पार्क, मिरा रोड (पू.) ४०१ १०७ ईमेल : dtomhmbd@rntcp.org

दि. 12/12/2023.

जा.क्र. मनपाराक्षदुका/383/2023-24

**मिरा भाईंदर महानगरपिलका कार्यक्षेत्रात कुष्ठरुग्ण शोध व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमे अंतर्गत प्रत्यक्ष घरोघरी तपासणीव्दारे कुष्ठरोगाचे 4 व क्षयरोगाचे 45 रुग्णाचे निदान**

राज्यातील सर्व जिल्हे व महानगरपालिका कार्यक्षेत्रात "कुष्ठरुग्ण शोध (LCDC) व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेस (ACF)" दि. 20/11/2023 ते 06/12/2023 रोजी राबविण्याबाबत शासनाकडून सूचना प्राप्त झाल्या होत्या.

त्या अनुशंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण लोकसंख्या 11,37,179 च्या 30 टक्के 3,39,592 जोखीमग्रस्त, स्थलांतरीत, बांधकाम क्षेत्र, झोपडपटटी क्षेत्रामध्ये 162 प्रशिक्षीत आरोग्य पथकामार्फत 3,06,609 (90 टक्के) रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामधून अंदाजित 68,519 घरे तपासली गेली आहेत. काही घरे ही मोहिमे काळात बंद स्वरुपात आढळली. सदर मोहिम ही 14 दिवसाकरीता राबविण्यात आली होती. त्यामधुन कुष्ठरोगासाठी एकुण 885 संशयीत रुग्ण तपासले गेले व 4 असांसर्गीक कुष्ठरोगाचे निदान झाले. तसेच क्षयरोगासाठी एकुण 2894 संशयीत रुग्ण तपासले गेले त्यामधून 45 क्षयरुग्णांचे निदान झाले. निदान झालेल्या सर्व रुग्णांना औषधोपचार चालू करण्यात आले आहे. सदर मोहिम यशस्वीरित्या राबविण्याकामी सर्व नागरी आरोग्य केंद्र, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, क्षयरोग कर्मचारी, आशा स्वयंसेवक यांचा मोलाचा हातभार लाभला.

शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बालनाथ चकोर, यांनी मोहिम यशस्वीरित्या राबविण्याकामी वेळोवेळी कर्मचाऱ्यांचा आढावा घेण्याबाबत भर देण्यात आला. तसेच मोहिम यशस्वीरित्या राबविण्याकामी मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर लहाने, मा. उपायुक्त (सार्व. आरोग्य) संजय शिंदे, अति. आयुक्त (डॉ. संभाजी पानपटटे), मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी मिरा भाईंदर जनतेस आवाहन करुन प्रत्यक्ष घरी येणाऱ्या पथकास सहकार्य करण्याबाबत आवाहन केले होते. तसेच त्यांच्या मोलाच्या मार्गदर्शनातून 14 दिवसाची मोहिम यशस्वीरित्या राबविण्यात आली.

(डॉ. बालनाथ चकोर)
शहर क्षयरोग अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner